# प्रेसनोट

दि. २६/०७/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | तोफखाना पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.८३५/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १) सागर एकनाथ भापकर, तलाठी सजा सावेडी, वर्ग–३, ता.नगर, जि.अहमदनगर<br>२) श्रीमती शैलजा राजाभाऊ देवकाते, मंडळाधिकारी, वर्ग–३, ता.नगर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४४,०००/– रुपये तडजोडीअंती ४०,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ––––– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांच्या संयुक्त नावे सावेडी, अहमदनगर येथे १८००० चौरस फुटचा प्लॉट आहे. सदर प्लॉटचे अहमदनगर महानगरपालिका यांचेकडील शासकीय रेखांकन करुन सदर प्लॉटचे बांधकाम करण्याकरीता २२ स्वतंत्र उपविभागनी केलेली आहे. लोकसेवक भापकर, तलाठी सजा सावेडी यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या २२ प्लॉटच्या फेरफार नोंदी ऑनलाईन अपलोड केल्याच्या मोबदल्यात ४४,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ४०,०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली व लोकसेविका शैलजा राजाभाऊ देवकाते, मंडळाधिकारी सावेडी यांनी तक्रारदार यांच्याकडून सदर प्लॉटच्या फेरफार नोंदी मंजूर करण्यासाठी ४४,०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारल्याचे मान्य करुन लोकसेवक भापकर, तलाठी यांच्यासाठी प्रत्येकी पाचशे रुपये प्रमाणे २२ प्लॉटचे ११,०००/– रुपये लाचेची मागणी केली.सदर बाबत आरोपी लोकसेवक १)सागर एकनाथ भापकर, तलाठी सजा सावेडी, ता.नगर, जि.अहमदनगर व २)श्रीमती शैलजा राजाभाऊ देवकाते, मंडळाधिकारी, ता.नगर, जि. अहमदनगर यांचेविरुध्द तोफखाना पो.स्टे. गुरनं.८३५/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.२६/०७/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००


(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर